साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ * पाने-४ * २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...

न्यू सुधांशु प्रिंटर्स

श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075

कापडी पिशव्या छापून मिळतील.

## घटस्थापनेने श्री कालरात्री देवी,डोंगरतुकाई देवी नवरात्र उत्सवाला होणार सुरूवात





परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्राचे शक्तीपीठ व लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या अंबाजोगाई श्री योगेश्वरी देवीच्या, तसेच परळी शहरातील श्री कालरात्री देवीच्या, परिसरातील डोंगरतुकाई देवीच्या, श्री पद्मावती देवीच्या नवरात्र महोत्सवाला सोमवारी (दि.२२) घटस्थापना व आरतीपूजेने सुरूवात होणार आहे. या उत्सवाची या मंदिरात तयारी पूर्ण झाली आहे. यानिमित्ताने श्री कालरात्री देवी व डोंगरतुकाई देवी मंदिरात श्री वैद्यनाथ देवस्थान संस्थेच्या वतीने रंगरंगोटी करण्यात आली आहे. भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून दर्शन रांगाची व्यवस्था केली गेली आहे. शिवाय मंदिर परिसरात मंडपही टाकण्यात आला आहे. सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरेही लावण्यात आले आहेत. भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाही ट्रस्टच्या वतीने केली गेली आहे. सोमवारी घटस्थापना होवून या मंदिरात नवरात्र उत्सवाला प्रारंभ होणार आहे. दहा दिवस मंदिरात विविध कार्यक्रम होणार आहेत. दरम्यान, परळी परिसरातील पुस येथील पद्मावती देवी, डिघोळ येथील देवीच्या मंदिरात नवरात्र उत्सवाची तयारी पूर्ण झाली आहे. परळी तालुक्तील डिग्रस, इंजेगाव, धर्मापुरी, परिसरातील घाटनांदूर येथील देवीच्या मंदिरातही नवरात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दरम्यान, परळी शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक दुर्गोत्सव मंडळानेही दुर्गामातेच्या स्थापनेची तयारी पूर्ण केली आहे. सोमवारी दुर्गामातेच्या मूर्तीची वाजतगाजत मिरवणूक काढुन स्थापना करण्यात येणार आहे. मंडळाने विविध कार्यक्रमाने यानिमित्ताने आयोजित केले आहेत. ***


## घटस्थापनेने होणार श्री योगेश्वरी देवीच्या नवरात्र उत्सवाला प्रारंभ; विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

अंबाजोगाई (बातमीदार):- राज्यातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या योगेश्वरी देवीच्या नवरात्र उत्सवास सोमवारी (दि.२२) घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. याची जय्यत तयारी योगेश्वरीच्या मंदिरात सुरू आहे. या उत्सवानिमित्त दहा दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत .

योगेश्वरी देवीचा हा नवरात्र उत्सव दसरा महोत्सव म्हणून साजरा केला जातो. या उत्सवात देवीच्या प्रत्येक माळेला विधिवत पूजन व आरती होते. मंदिर परिसरात भजन, कीर्तन, प्रवचन, गायन, वादन शारदोत्सव असे विविध कार्यक्रम होतात.

सोमवारी सकाळी १० वाजता घटस्थापनेने या दसरा महोत्सवाला प्रारंभ होतील. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात देवीची शासकीय पूजा होईल. मंदिराच्या परिसरात उभारण्यात आलेल्या मंडपात दररोज दुपारी १२ ते सायंकाळी सहा यावेळेत विविध महिला भजनी मंडळांच्या भजनाचे कार्यक्रम होतील. सायंकाळी सहाच्या नंतर गायन व कीर्तनाचे कार्यक्रम होतील. या कार्यक्रमासाठी मंदिर परिसरात मंडप उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. याच मंडपात सर्व सांस्कृतिक कार्यक्रम, भजन व किर्तन होणार आहे.

बुधवारपासून (दि.२४) ते सोमवार (दि.२९) पर्यंत सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत रामायणाचार्य रामराव ढोक महाराज हे रामकथा सांगणार आहेत. या रामकथेचा लाभ सर्व भाविकांनी घ्यावा असे आवाहन देवल समितीचे अध्यक्ष





तथा तहसीलदार विलास तरंगे, सचिव गिरधारीलाल भराडिया, उपाध्यक्ष अक्षय मुंदडा, उत्सव प्रमुख उल्हास पांडे, पूजा कुलकर्णी यांच्यासह सर्व विश्वस्तांनी केले आहे.

सोमवारी (दि.२२) सायंकाळी ६ ते ७ यावेळेत मुंबईच्या असावरी देगलुरकर यांचे गायन होईल. रात्री ८ ते १० यावेळेत पुण्यातील रेवा नातु यांचे गायन होणार आहे.मंगळवारी (दि.२३) सायंकाळी ७ वाजता मुंबईच्या भाग्यश्री पाटील व ८.३० वाजता भाग्यश्री टिकले यांचे गायन होणार आहे. बुधवारी (दि.२४) सायंकाळी ५ वाजता लातूर येथील वृषाली कोरडे यांचे गायन, ६ वाजता पुणे येथील जयंत केजकर यांचे गायन होईल. गुरुवारी (दि.२५) दुपारी ४ वाजता स्थानिक कलावंताचे गायन, सायंकाळी ६ वाजता पांडूरंग देशपांडे व सरोजिनी देशपांडे यांचे गायन होईल. रविवारी (दि.२८) सायंकाळी ५ वाजता शिवकुमार मोहेकर यांचा 'जगदंबेचा गोंधळ' व जगविख्यात पखवाज वादक पंडित उध्दव आपेगावकर यांचे पखवाज वादन होईल. सोमवारी (दि.२९) दुपारी १ वाजता प्रा. रमेश सरवदे यांचा स्वरांजली, ४ वाजता अजय सुगांवकर यांचे गायन, ५ वाजता पुणे येथील शुभदा देशपांडे यांचे गायन होईल. बुधवारी (दि.१) नवमीच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता प्रकाश बोरगावकर प्रस्तुत 'जागर योगेश्वरी मातेचा' हा गायनाचा कार्यक्रम होईल. रात्री ७.३० पंचमवेद प्रतिष्ठानचे डॉ.विनोद निकम व अनुराधा निकम यांचा नृत्यभक्ती हा भरतनाट्यम चा कार्यक्रम होईल. या उत्सवात किसन महाराज पवार, अंबादास महाराज चिक्षे यांचे किर्तन होणार आहे.

मंगळवारी (दि.३०) आष्टमीनिमित्त दुपारी २ वाजता मंदिराच्या मुख्य यज्ञ सभामंडपात पुरोहितांच्या मंत्रोच्चारात होम हवन होईल. सायंकाळी ६.१५ वाजता पूर्णाहुती पडेल. या पूर्णाहुतीनंतर शासकीय पूजेनिमित्त सायंकाळी ६ ते रात्री ८.३० पर्यंत सार्वजनिक दर्शन बंद राहणार आहे. याची भाविकांनी नोंद घ्यावी.

गुरुवारी (दि.२) दसऱ्यानिमित्त दुपारी १२.१५ वाजता योगेश्वरीची पालखी मिरवणूक सिमोल्लंघनासाठी निघणार आहे. शहरातील मंडीबाजार, खोलेश्वर मंदिर, रविवारपेठ, खडकपूरा, परळीवेस, अण्णाभाऊ साठे चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सावरकर चौक, सायगाव नाका, जुना पंप, मोंढा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुरुवारपेठ मार्ग मंदिरात पालखी मिरवणूक विसर्जित होईल.**

## बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची आ.धनंजय मुंडे यांची मागणी



बीड (बातमीदार):- जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू असलेल्या आढावा बैठकीत घेण्यात आला. यावेळी परळी मतदारसंघासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली असून, खरीप पिके हातातून गेली आहेत तसेच जन जीवन विस्कळीत होऊन प्रचंड वाताहत झाली असल्याचे नमूद करत माजी मंत्री, आ. धनंजय मुंडे यांनी संपूर्ण बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून त्यातील निकषानुसार जिल्ह्यातील शेतकरी व आपत्ती ग्रस्तांना मदत करण्याची लेखी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन आ. धनंजय मुंडे यांनी अजित पवार यांना दिले आहे.

## कंधार येथे जनाई कोकाटे यांच्या भागवत कथेचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- नांदेड जिल्हा कंधार येथे भव्य श्रीमद्भागवत कथेचे आयोजन करण्यात आल्याचे श्री भवानी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष शहाजी नळगे व सचिव तथा कंधार पोलिस पाटील श्री व्यंकटराव जाधव यांनी कळवले आहे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परळी तालुक्याची कन्या संगमकर श्रीमद्भागवत कथा प्रवक्त्या ह.भ.प.जनाई महाराज कोकाटे यांच्या मुखारविंद्वातुन कथा दि.२३ सप्टेंबर रोजी मंडळ रोजी दुपारी १ते ५ कथेला प्रारंभ होणार आहे. तरी हजारो भाविकांनी उपस्थित राहावे जनाई महाराज कोकाटे यांच्या मधुर वाणीतून कथा सजिव



देखाव्या सहित कथा होणार आहे या महोत्सवाचे आकर्षण श्रीमद्भागवत कथा देशविदेशातील नाविन्यपूर्ण झुले,आकाशी पाळणे ब्रेक डॉन्स झुला डायनासोर ड्रेगन ट्रेन मिमिक्रीमाऊस इत्यादी आकर्षक विविध भरगच्च कार्यक्रम कार्यक्रमाने दसरा उत्सव होणार आहे दुपारी भागवत कथा व रात्री भरगच्च कार्यक्रमे होणार आहे परिसरातुन हाजारो भाविक जनाई महाराज कोकाटे यांच्या कथेला उपस्थित राहाणार आहेत. **

## न्यू हायस्कूल ज्युनियर कॉलेजचा तन्मय तिडके याची विभागीय रोडरेस साठी निवड

परळी वैजनाथ, (बातमीदार):- क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संभाजीनगर,यांच्या संयुक्त विद्यमाने बीड जिल्हा सायकलींग क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये न्यू हायस्कूल ज्युनियर कॉलेज टी पी एस परळी चा सायकलपटु चि.तन्मय संतोष तिडके इयत्ता ११ वी याने टाईम ट्रायल मध्ये प्रथम क्रमांक मिळवून त्याची विभागीय रोड रेस स्पर्धेसाठी निवड झाली. मशिप्र मंडळ अध्यक्ष आमदार प्रकाश दादा सोळंके,



आमदार सतिशभाऊ चव्हाण, शालेय समिती अध्यक्ष नानासाहेब सोळंके काका, कॉलेज चे प्राचार्य किशनराव मोरे, उपप्राचार्य सुनिल लोमटे, क्रिडा मार्गदर्शक प्रा.अनिल इथापे व सर्व प्राध्याकवृंद या सर्वांनी तन्मयचे कौतुक व अभिनंदन केले आहे. तसेच पुढील विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. ***

## गटशिक्षणाधिकारीपदी गणेश गिरी यांची नियुक्ती

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारीपदी गणेश गिरी यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांनी पदाची सूत्रे स्वीकारली आहेत.

या पदावर कार्यरत असलेले श्रीराम कनाके यांनी काही वर्ष गटशिक्षणाधिकारीपदाचा कार्यभार सांभाळला त्यानंतर त्यांची परळी येथून बदली झाली. त्यांच्या जागी श्री गिरी रूजू झाले आहेत. यापूर्वी परळीचे



गटशिक्षणाधिकारी म्हणून श्री गिरी काम पाहिले होते. श्री गिरी यांनी पदभार घेतल्यानंतर शिक्षक, कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आहे.

दरम्यान, श्री गिरी यांचा येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सत्कार करण्यात आला. यावेळी शिक्षक नेते श्याम आघाव, शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद कराड, संगणक विभाग प्रमुख बाळासाहेब बोंदर, आदर्श शिक्षक अशोक नावंदे, दगडवाडी शाळेचे मुख्याध्यापक पुरुषोत्तम केंद्रे, हरिश्चंद्र चाटे, संतोष सावजी, प्रदीप चाटे, प्रकाश चाटे, परमेश्वर दहिफळे, रत्नाकर फड, केंद्रप्रमुख नवनाथ राख, चांगिरे, पडगी, जातकर, रेवलकर उपस्थित होते. ***

# सौ.वर्षाराणी हाके व विनायक देशमुख यांची आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड







## 'शिक्षणमार्ग' च्या शिक्षक साहित्य संमेलनात होणार पुरस्काराचे वितरण



परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथून प्रकाशित होणाऱ्या साप्ताहिक शिक्षण मार्ग च्या वतीने सातव्या मराठवाडा विभागीय शिक्षक साहित्य संमेलनाच्या निमित्ताने देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी येथील उर्जानगर वसाहतीतील न्यू हायस्कूल शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका वर्षाराणी लक्ष्मणराव हाके व नवीन प्राथमिक शाळेतील शिक्षक विनायक ज्ञानेश्वरराव देशमुख यांची निवड करण्यात आली आहे.

शिक्षण मार्गचे संपादक व संमेलनाचे प्रमुख रानबा गायकवाड यांच्यासह निवड समितीच्या सदस्यांनी सौ.हाके, श्री देशमुख यांची पत्राद्वारे ही निवड केली आहे. येत्या १६ नोव्हेंबरला येथे होणाऱ्या शिक्षक साहित्य संमेलनात या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतीचिन्ह, गौरवपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराबद्दल सौ.हाके व श्री देशमुख यांचे संपादक रानबा गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

दरम्यान, वर्षाराणी हाके या न्यू हायस्कूल शाळेत गणित विषयाच्या विद्यार्थीप्रिय शिक्षिका आहेत. विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी असलेली भीती दूर करण्यासाठी सौ. हाके मॅडम सातत्याने प्रयत्नशिल असतात. गणित हा विषय विद्यार्थ्यांसाठी केवळ अभ्यासक्रमाचा भाग न राहता, एक विचारपद्धती म्हणून समजला जातो. गणित विषयातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे.

तसेच विनायक देशमुख हे विद्यार्थीप्रिय शिक्षक आहेत. आपले अध्यापन आनंददायी व कृतीयुक्त करून विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम ते सातत्याने करतात. सृजनशिल शिक्षक म्हणून त्यांची ओळख आहे. आपल्या विषयाची आवड विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी म्हणून ते सातत्याने प्रयत्न करत असतात. शिक्षणक्षेत्रातील त्यांचे कार्य उल्लेखनिय आहे.

सौ.हाके व श्री देशमुख यांना आदर्श शिक्षक पुरस्काराबद्दल शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, शालेय समितीचे पदाधिकारी व इतरांनी अभिनंदन केले आहे. दरम्यान, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी सौ.हाके व श्री देशमुख यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन शाळेत सत्कार करण्यात आला. यावेळी शालेय समितीचे ज्येष्ठ सदस्य बाळासाहेब



देशमुख, संस्थेचे सदस्य अजय सोळंके यांच्यासह न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक के.व्ही.मोरे, पर्यवेक्षिका छाया देशमुख, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, पर्यवेक्षक उमेश देशमुख, एल.आय.वाकडे यांच्यासह ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे, अमोल कांबळे, राहूल ताटे, संजय वानखेडे, श्री शहापुरे, नारायण वानखेडे, संजय सुरवसे, श्री शास्त्री, श्री गडदे आदींसह शिक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. **

# महात्मा फुले शिक्षक पतसंस्था सभासदांना नऊ टक्के रोखीने लाभांश देणार-बंडू अघाव

परळी वैजनाथ, (बातमीदार):- येथील मान्यताप्राप्त, खासगी प्राथमिक, माध्यमिक विविध अनुदानीत शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांच्या महात्मा ज्योतिबा फुले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना ९ % टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष बंडू अघाव यांनी दिली.तर पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा कारभार पारदर्शक आसून पतसंस्थेची योग्य दिशेने प्रगतीकडे वाटचाल सुरू आसल्याचे मत पी.एस.घाडगे यांनी व्यक्त केले.

या संस्थेची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार (दि.१७) सप्टेंबर रोजी येथील कै.लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात मध्ये खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली.महात्मा जोतिबा फुले व स्वामी रामानंद यांच्या प्रतिमा पुजन करून सभेस सुरुवात करण्यात आली. यावेळी सभेस संबोधीत करताना श्री अघाव बोलत होते. सभेला संस्थेचे मार्गदर्शक




तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे, संस्थेचे सचिव आलिशान काजी मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे, लिंबाजी दहिफळे, अरुण पवार,राजकुमार लाहोटी, लोकमान्य नागरी सह.पतसंस्थेचे (मल्टीस्टेट) मुख्यकार्यकारी अधिकारी नितीन वायचळे आदि मान्यवर उपस्थित होते.

श्री अघाव म्हणाले, गेल्या १० वर्षापूर्वी शिक्षक नेते तथा लोकमान्य पतसंस्थेचे अध्यक्ष पी.एस.घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेल्या या संस्थेचे सरत्या अर्थिक वर्षातील भागभांडवल ५६ लाख ६१ हजार रूपये आहे तर तालुक्यातील एकूण पंधरा शाळेतील १३० शिक्षक ,शिक्षकेत्तर कर्मचारी पतसंस्थेचे सभासद आहेत.संस्थेला सरलेल्या आर्थिक वर्षात ७ लाख ४७ हजार ३७१ रूपये नफा झाला आसून संस्थेकडून सभासदांना पाच लाख रूपयापर्यंत साधे कर्ज दिले जाते तर एक लाखा पर्यंत तातडी कर्ज दिले जाते.संस्थेचा गेल्या पाच-सहा वर्षांपासून ऑडिट वर्ग 'अ' आसल्याचे सांगून श्री अघाव यांनी सभासदांना ९ % टक्के रोखीने लाभांश देण्यात येणार असल्याची माहिती दिली.

संस्थेचे मार्गदर्शक पी.एस.घाडगे तसेच सर्व संचालक,मुख्याध्यापक व सभासदांचे सहकार्य या बळावर संस्थेची प्रगतीकडे वाटचाल चालू असल्याचे श्री अघाव यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे मार्गदर्शक पी.एस. घाडगे यांनी सभेस संबोधित केले.यावेळी संस्थेचे माजी संचालक महादेव धायगुडे, शिवाजी शिंदे, सौ.स्वाती इंगळे यांचा शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

सुत्रसंचालन संस्थेचे कोषाध्यक्ष अशोक जाधव यांनी केले तर आभार संचालक उत्तम साखरे यांनी मानले. सभा यशस्वी करण्यासाठी संस्थेचे संचालक बालाजी कांबळे, रवि मगर श्रीमती सुषमा नागरगोजे,भाग्यश्री साखरे,लोकमान्य नागरी पतसंस्थेचे शाखाधिकारी चंद्रशेखर सरकटे,महात्मा जोतिबा फुले पतसंस्थेचे व्यवस्थापक रमेश देशमुख यांच्यासह लोकमान्य नागरी पतसंस्थेचे सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सभेला सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

### खरय.. पण...

खरेपणा सिद्ध करता येत नाही म्हणून कित्येकदा...
खरी माणसं परिस्थितीमुळे खोटी पडतात...!

# परळी-गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे अपूर्ण काम त्वरित पूर्ण करा

## अँड.संकाये यांनी बेशरम लागवड करून केले आंदोलन



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी गंगाखेड राष्ट्रीय महामार्गाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले असून रस्त्यावरील खड्डे आणि अपूर्ण कामामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. वारंवार निवेदनं देऊनही आणि माध्यमांमधून बातम्या झळकूनही प्रशासन व संबंधित अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा आरोप करत सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांच्या नेतृत्वाखाली आज रस्त्याच्या कडेला 'बेशरम लागवड आंदोलन' छेडण्यात आले.

या आंदोलनात शेतकरी, युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात बेशरमाची रोपे घेऊन रस्त्याच्या कडेला लागवड करून शासनाचा निषेध व्यक्त केला. '' राष्ट्रीय महामार्गातच्या अधिकाऱ्याचं करायचं काय खाली मुंडकं वर पाय'' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

अँड. मनोज संकाये यांनी सांगितले की, ग्रामस्थांना दररोज या रस्त्यामुळे अपघातांचा व हालअपेष्टांचा सामना करावा लागतो. रखडलेल्या पुलामुळे एक जणांच्या गळ्यात गज घुसण्याचा प्रयत्न झाला व दोघेजण पुलावरून खाली पडून गंभीर जखमी झाले अशा घटना वारंवार घडत आहेत. निवेदनं देऊनही प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळे निषेध म्हणून आम्ही हे प्रतीकात्मक आंदोलन सुरू केले आहे. लवकरच काम पूर्ण न झाल्यास आम्ही मोठ्या आंदोलनाची हाक देऊ.

यावेळी सेलूचे सरपंच बाळासाहेब फड,शिरीष सलगरे,किरण मुंडे,प्रवीण रोडे, शिवा बडे, भागवत रेवले,( नैकोटा )घोडके ,माणिक सोनवणे( लोणी), काशिनाथ सरवदे ,अविनाश नागरगोजे,सुंदर आव्हाड,देवा कांबळे,अनंत कातकडे, बालू कराड,गोविंद कांदे,महादेव कांदे, वैजनाथ कांदे,प्रेम मुंडे, देवदास मुंडे,वसंत मुंडे,गणपत मुंडे, भरत कांदे,रावसाहेब जाधव,राम गडदे आदीसह मित्रमंडळाचे पदाधिकारी,गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

### हसरा कोपरा..!

*डियर पावसा हा जुलै महिना नाही हा सप्टेंबर महिना आहे रावणाला आपल्याला जाळायचा आहे बुडवून नाही मारायचा..!*

संपादकीय...

# गौरव शिक्षकांचा...!

**✻ सुविचार ✻**

**आपल्या नशिबाला दोष देण्याऐवजी आपण परिश्रमाची ताकद वाढवली व सकारात्मक विचार केला तर नशिबाला देखील आपल्यासमोर नतमस्तक व्हावेच लागेल..!**

मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेच्या वतीने गेल्या वर्षीचा अपवाद वगळता मागच्या चौदा वर्षापासून परळी तालुक्यात विविध शाळा, महाविद्यालयात उल्लेखनिय शैक्षणिक, सामाजिक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी काम करणाऱ्या शिक्षकांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविले जाते. शिवाय काही शिक्षकांचा सेवागौरव पुरस्कार देऊनही गौरव केला जातो. आजपर्यंत एकशे पासष्टवर शिक्षकांचा गौरव करण्यात आला आहे. दरवर्षी दहा-पंधरा गुरूजनांचा खास समारंभात शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरवपत्र, पुष्पहार, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला जातो. मसापच्या या उपक्रमाची शहर, तालुक्यात चर्चा व कौतुक होते. शिवाय दरवर्षी या पुरस्कारासाठी कोणा-कोणाची निवड होते याचीही उत्सुकता असते. शिक्षकांना हा पुरस्कार देताना कोणताही प्रस्ताव मागविला जात नाही, की मला पुरस्कार द्या म्हणून अर्ज घेतला जात नाही. चांगले काम करणाऱ्या शिक्षकांचा शोध घेऊन त्यांच्या कार्याबाबत चार चौघाशी चर्चा करून पुरस्कारासाठी निवड करण्याबाबत निर्णय घेतला जातो. खास समारंभाचे आयोजन करून मान्यवरांच्या हस्ते निवडलेल्या शिक्षकांचा गौरव केला जातो. यामुळे चांगले काम करणाऱ्या शिक्षकांची दखल तर घेतली जातेच शिवाय या शिक्षकांचाही उत्साह वाढतो. मसापच्या परळी शाखेचा हा उपक्रम खरोखरच कौतुकास्पद आहे.

परळी पालिकेनेही काही वर्षापूर्वी परळी शहरात विविध शाळा, महाविद्यालयात चांगले काम करणाऱ्या शिक्षकांची दखल घेत त्यांनाही 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देण्याचा उपक्रम सुरू केला होता. शिवाय चांगल्या शाळांची 'आदर्श शाळा' पुरस्कारासाठी निवड करून या शाळेचा गौरवही केला होता. असे उपक्रम कौतुकास्पद असतात.

अलिकडच्या काळात एखादा पुरस्कार मिळवणे किती सोपे झाले आहे हे आपण पाहातोच. अशा परिस्थित चांगले काम करणारे दुर्लक्षित राहतात. त्यांच्यावर अन्याय होतो. परंतु चांगल्या कामाची विद्यार्थी, पालक व समाजही दखल घेत असतो. या गोष्टीला वेळ लागत जरी असला तरी मिळालेला पुरस्कार व झालेला सन्मान खूप मोठा असतो, हे विसरून चालणार नाही.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने यंदा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळालेल्या शिक्षकांचे खुपखूप अभिनंदन! हा पुरस्कार मिळाला म्हणून आपले काम संपले असे नाही आता कामाची आणखी जबाबदारी वाढली आहे. आपले काम अधिक जोमाने, निष्ठेने व प्रामाणिकपणे करण्यासाठी हा पुरस्कार आहे असे आम्हाला वाटते. कामात अडचणी, प्रश्न अनंत आहेत. परंतु त्यातून मार्ग काढत कोवळ्या फुला-मुलांना आकार देण्याचे भाग्य आपल्याला लाभले आहे. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दाटून यावा, त्यांचे व्यक्तिमत्व, भवितव्य आपल्या मदतीने, दाखवलेल्या वाटेने खुलावे, फुलावे एवढीच अपेक्षा.

दरम्यान, हा उपक्रम राबविणाऱ्या मराठवाडा साहित्य परिषदेच्या परळी शाखेचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. साहित्य परिषद शिक्षकांचा गौरव करते ही बाब उल्लेखनिय आहे. असा उपक्रम मराठवाड्यात परळी शाखेच्या वतीनेच होत असावा, याबद्दल साहित्य परिषदेचे नुतन अध्यक्ष विजयशेठ वाकेकर, सचिव प्रा.राजकुमार यल्लावाड, निवड समितीचे बंडू आघाव व सर्व पदाधिकारी, सदस्यांचे यासाठी अभिनंदनच..!

दरम्यान, यंदा या पुरस्काराबरोबरच साहित्य परिषदेच्या कार्यक्रमात स्व.सुवालालजी वाकेकर स्मृतीपुरस्काराचे वितरणही झाले. यामुळे हा कार्यक्रम आणखीणच भरगच्च झाला. यंदाच्या स्व.सुवालाल वाकेकर स्मृतीपुरस्कारासाठी निवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, साहित्यिक अमर हबीब, शिक्षक पी.टी.मुंडे यांचा झालेला गौरव या पुरस्कारांची उंची वाढवणारा ठरला. याबद्दल संयोजकांचे कौतुकच..!

# विद्यानिकेतन प्राथमिक विद्यालय : परळीच्या शिक्षणक्षेत्रात नवी शाळा

आजच्या काळात शिक्षण हे केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाही. ते एक सजीव, सर्जनशील आणि मूल्याधारित प्रक्रिया बनली आहे. अशा काळात, परळी वैजनाथमधील विद्यानिकेतन प्राथमिक विद्यालय ही शाळा एक आदर्श ठरते. जी शिक्षणाच्या नव्या वाटा शोधते, आणि विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेसाठी नव्हे तर जीवनासाठी तयार करते.

श्री.सचिन सारडा,श्री योगेश मेनकुदळे आणि श्री. प्रणव परळीकर उद्योगजगतातून शिक्षणासाठी समर्पित हे यशस्वी उद्योजक असूनही शिक्षण क्षेत्राबद्दल त्यांना विशेष प्रेम आहे. त्यांचा उद्देश आहे तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षणात क्रांती घडवणे. ते ळपींळअॅू-लरीशव आणि ॲिक्षशलीं-लरीशव श्रशरॲपळपस ला प्रोत्साहन देतात, जे विद्यार्थ्यांना आत्मशोध, प्रयोगशीलता आणि सर्जनशील विचारांची संधी देतात. त्यांच्या सहकार्यामुळे शाळेत स्मार्ट बोर्ड, टॅबलेट्स, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स यांचा वापर सुरू झाला आहे, ज्यामुळे शिक्षण अधिक संवादात्मक आणि आकर्षक बनले आहे.

**नेतृत्व-जागतिक अनुभवाचा स्थानिक लाभ-** शाळेचे मुख्याध्यापक श्री संदीप संभाजी मुंडे हे शिक्षण क्षेत्रातील एक अत्यंत सन्माननीय नाव आहे. त्यांचा इंटरनॅशनल बॅक्युलिरेट (खइ) बोर्डाशी संलग्न असलेल्या विविध देशांतील शाळांमध्ये काम करण्याचा अनुभव ही शाळेची सर्वात मोठी ताकद आहे. त्यांनी बँकॉक, व्हिएतनाम, कांगो, सिंगापूर व इंग्लंड इत्यादी देशांमधील शाळेत अध्यापनाचे काम केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यानिकेतनमध्ये जागतिक दर्जाचे शैक्षणिक तत्त्वज्ञान स्थानिक गरजांशी जोडले जाते.

श्री मुंडे यांचा दृष्टिकोन म्हणजे विद्यार्थ्यांना विचारशील, सर्जनशील आणि जबाबदार नागरिक बनवणे. त्यांच्या अनुभवामुळे शाळेतील शिक्षकवर्गाला आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रशिक्षण मिळते, आणि विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी तयार



केले जाते.

**स्थानिक सोयी आणि शैक्षणिक दृष्टी-** शाळा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे पालकांसाठी अत्यंत सोयीची आहे. वाहतुकीची सुविधा, सुरक्षित परिसर आणि सहज पोहोचता येणारे स्थान यामुळे ही शाळा पालकांच्या पहिल्या पसंतीत येते.

पण केवळ भौगोलिक सोयीपुरतेच नव्हे ही शाळा शिक्षणतज्ज्ञांचा सल्ला घेऊन आपले वार्षिक नियोजन करते. अभ्यासक्रम, उपक्रम, प्रकल्प, मूल्यशिक्षण प्रत्येक गोष्टीत तज्ज्ञांचा विचार आणि मार्गदर्शन असते. त्यामुळे शिक्षण ही एक सुसंगत, संशोधनाधारित आणि विद्यार्थ्यांच्या गरजांशी सुसंगत प्रक्रिया बनते.

**शैक्षणिक वैशिष्ट्ये:-**

**अनुभवाधारित शिक्षणाचा पाया-** विद्यानिकेतनमध्ये शिक्षण हे कृतीतून, अनुभवातून आणि संवादातून घडते. खाली दिलेली वैशिष्ट्ये ही शाळेच्या शैक्षणिक दृष्टिकोनाची साक्ष देतात:

**१) कृतीतून शिकणे:-** विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकवले जाते. विज्ञान प्रयोग, गणितीय खेळ, हस्तकला, आणि सामाजिक उपक्रम यामुळे ज्ञान केवळ वाचलेले नसते ते अनुभवलेले असते.

उदाहरणार्थ, चौथीतील मुलीने 'प्लास्टिकचा पर्याय' या विषयावर प्रकल्प तयार केला आणि कागदी पिशव्या बनवून शाळेत वाटप केल्या. जेव्हा तिचा प्रकल्प सभागृहात सादर झाला, तेव्हा ती म्हणाली माझ्या कल्पनांना सगळ्यांनी ऐकले. मला वाटले मी काहीतरी महत्त्वाचे केले आहे.

**२) वास्तवाशी नातं:-** शाळेतील प्रत्येक उपक्रम हा विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेला असतो. 'पाणी वाचवा', 'कचरा व्यवस्थापन', 'स्थानिक बाजारभेट' यासारख्या उपक्रमांमुळे शिक्षण हे समाजाशी जोडले जाते. तिसरीतील मुलीने शाळेतील पाण्याच्या टाकीवर वाचवा लिहिण्याची कल्पना शिक्षकांना दिली. ती कल्पना स्वीकारली गेली आणि तिने लिहिले. मी सांगितलेलं ऐकून सगळ्यांनी ते केलं. मला वाटलं मी शाळेसाठी काहीतरी केलं.

**३) प्रकल्पाधारित शिक्षण:-** विद्यार्थ्यांना विविध विषयांवर आधारित प्रकल्प दिले जातात पर्यावरण, आरोग्य, तंत्रज्ञान, सामाजिक समता. हे प्रकल्प त्यांना संशोधन, सादरीकरण, आणि सहकार्य शिकवतात. चौथीतील मुलाने 'स्वच्छ गाव' प्रकल्पात गटनेता म्हणून काम केले. त्याने सांगितले सगळे माझं ऐकत होते. मला वाटलं मी काहीतरी मोठं करत होतो.

**४) आत्मपरीक्षणाची संधी:-** प्रत्येक उपक्रमानंतर विद्यार्थ्यांना स्वतःच्या शिकण्यावर विचार करायला लावले जाते. हे त्यांना वैयक्तिक प्रगतीस चालना देते. चौथीतील मुलाने एका प्रकल्पात चुकीची माहिती दिली होती. शिक्षकांनी त्याला समजावून सांगितले आणि पुन्हा प्रयत्न करायला प्रोत्साहित केले. मुलगा म्हणाला माझी चूक झाली, पण मला पुन्हा प्रयत्न करायला सांगितलं. मला वाटलं की मी शिकू शकतो.

**५) सहकारी शिक्षण:-** गटात काम करताना विद्यार्थी एकमेकांकडून शिकतात. सहकार्य, मतभेद समजून घेणे, आणि सामूहिक निर्णय घेणे ही कौशल्ये त्यांच्या सामाजिक विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरतात.

**६) शैक्षणिक सहली:-** विद्यानिकेतन नियमितपणे विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलींना घेऊन जाते ऐतिहासिक स्थळे, विज्ञान केंद्रे, स्थानिक उद्योग. हे अनुभव त्यांच्या ज्ञानाला वास्तवाशी जोडतात.

**७) समस्यांवर आधारित शिक्षण:-** विद्यार्थ्यांना वास्तवातील समस्यांवर विचार करायला लावले जाते. हे त्यांना विचारशील आणि जबाबदार नागरिक बनवते.

**८) शाश्वत विकास उद्दिष्टांचा समावेश:-** शाळा संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत उपक्रम राबवते. जागतिक दृष्टिकोन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवला जातो.

९) 3Rs-Reduce, Reuse, Recycle पर्यावरण संवर्धनासाठी शाळा ३ठ चा अंगीकार करते. विद्यार्थ्यांमध्ये र्यावरणाबद्दलची संवेदनशीलता निर्माण केली जाते.

**१०) डिजिटल शिक्षणाचे केंद्र:-** स्मार्ट बोर्ड, टॅबलेट्स, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्स यांचा वापर करून शिक्षण अधिक संवादात्मक आणि आकर्षक बनवले जाते. दुसरीतील मुलाने गणिताच्या वर्गात आकृत्यांवर आधारित रंगीत चित्र तयार केले. शिक्षकांनी ते वर्गात लावले. कबीर म्हणाला...माझं चित्र सगळ्यांना आवडलं. मला वाटलं मी खूप चांगलं काम केलंय.

**विद्यार्थ्यांना कसे मूल्य दिले जाते?** विद्यानिकेतनमध्ये प्रत्येक विद्यार्थी हा एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व मानला जातो. त्याच्या जिज्ञासेला, भावनांना आणि विचारांना आदर दिला जातो. शिक्षक विद्यार्थ्यांशी संवाद साधतात, त्यांचे मत विचारात घेतात, आणि त्यांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करतात.

✻ शिकण्याची प्रक्रिया वैयक्तिक आणि गटाधारित असते.

✻ शाळेत 'Student Voice' ला महत्त्व दिले जाते. ✻ शाळेतील वातावरण प्रेमळ, सुरक्षित आणि प्रेरणादायी असते.

✻ शिक्षक विद्यार्थ्यांचे कौतुक करतात, त्यांना प्रोत्साहन देतात. ✻ विद्यार्थ्यांना त्यांच्या शिकण्याचा उद्देश समजावून सांगितला जातो.

या सर्व अनुभवांमधून विद्यार्थ्यांना मी महत्त्वाचा आहे, माझं मत ऐकले जातं, मी शिकू शकतो अशा भावना मिळतात ज्या त्यांच्या आत्मविश्वासाला आणि शिकण्याच्या प्रेरणेला चालना देतात.

**पालकांसाठी का योग्य निवड आहे?**

✻ जागतिक दर्जाचे नेतृत्व- श्री मुंडे यांचा अनुभव विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण देतो. ✻ सर्वांगीण विकासाची हमी- भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी ही शाळा सर्वोत्तम आहे.

✻ सुलभ स्थान- शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्यामुळे दैनंदिन सोयीसाठी आदर्श. ✻ शिक्षणतज्ज्ञांचा सल्ला- अभ्यासक्रम आणि उपक्रम हे संशोधनाधारित आणि सुसंगत असतात. ✻ भविष्यासाठी तयारी- डिजिटल कौशल्ये, जागतिक दृष्टिकोन आणि मूल्याधारित शिक्षण विद्यार्थ्यांना सक्षम बनवते.

**शाळेचा भविष्यकालीन दृष्टीकोन विद्यानिकेतन पुढील काही वर्षांत:** ✻ STEAM शिक्षणाचा विस्तार ✻ आंतरराष्ट्रीय सहकार्य ✻ स्थानिक भाषांमध्ये शिक्षणाचा समावेश ✻ समावेशक शिक्षणासाठी विशेष गरजांच्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा. विद्यानिकेतन प्राथमिक विद्यालय हे शिक्षणाच्या नव्या युगाचे प्रतीक आहे. जागतिक अनुभव, स्थानिक गरजांची समज, आणि सर्जनशील दृष्टिकोन यांचा संगम म्हणजे ही शाळा. पालकांनी ही शाळा निवडल्यास, ते त्यांच्या मुलाच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करत आहेत.

**विद्यानिकेतन जिथे शिक्षण म्हणजे विचार, कृती आणि परिवर्तन.**

**-अमोल कांबळे**
परळी वैजनाथ, जि.बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशु प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायक्षेत्र) **www.parliparisar.com**

✻ वर्ष ०९ ✻ अंक २० ✻ पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २२ सप्टेंबर २०२५ ✻ किंमत : २ रू.

# माणूस म्हणून जगण्याची शिकवण आपल्याला शिक्षकांकडून मिळते-किरणकुमार गित्ते

## म.सा.प.च्या आदर्श शिक्षक व स्व.सुवालालजी वाकेकर स्मृतीपुरस्कारांचे थाटात वितरण






परळी वैजनाथ, (बातमीदार):- माणूस म्हणून जगण्याची शिकवण आपल्याला शिक्षकांकडून मिळते असे प्रतिपादन त्रिपुरा राज्याचे सचिव किरणकुमार गित्ते यांनी केले.

येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने शिक्षकदिनानिमित्त देण्यात येणारे आदर्श शिक्षक पुरस्कार व स्व. सुवालालजी वाकेकर स्मृतीपुरस्कार वितरण कार्यक्रमात श्री गित्ते बोलत होते. परळीतील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या सभागृहात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी (दि.१७) हा कार्यक्रम झाला. व्यासपीठावर परळी मसापचे अध्यक्ष विजय वाकेकर, प्रमुख पाहुणे म्हणून जवाहर एज्युकेशन सोसायटीचे सचिव दत्ताप्पा इटके, माजी नगराध्यक्ष बाळासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ.जगतकर आदी मान्यवर उपस्थित होते.

श्री गित्ते पुढे बोलताना म्हणाले, सोशल मिडियाच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी साहित्य वाचन कमी होत चालले आहे, मराठी साहित्य नव्या पिढीपर्यंत पोहंचविण्याची जबाबदारी आज शिक्षकांची आहे, असे सांगून महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डी.वाय.पाटील यांनी शिक्षण क्षेत्रात घालून दिलेला आदर्श शिक्षकांनी ठेवून आपली वाटचाल केली पाहिजे, असे ते म्हणाले. चांगल्या कामासाठी समाजाने शिक्षकांना दिलेला पुरस्कार बळ देतो असेही श्री गित्ते यांनी सांगितले. प्रास्ताविक साहित्य परिषदेचे सचिव प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड यांनी केले. मसापच्या परळी शाखेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती त्यांनी यावेळी दिली. दत्ताप्पा ईटके यांनी यावेळी बोलतांना साहित्य परिषदेच्या परळी शाखेच्या उपक्रमाचे कौतुक करून साहित्य परिषदेला श्री वाकेकरांमुळे बळ मिळाल्याचे सांगून शाळकरी मुले व्यासधिनतेपासून वाचविण्याची जबाबदारी शिक्षकांची आहे, यासाठी शिक्षकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आदर्श शिक्षक पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले शिक्षक प्रमोद गादेकर यांनी यावेळी बोलताना चांगल्या कार्याची दखल समाजाने घेऊन समाजाकडून झालेला शिक्षकांचा गौरव शिक्षकांच्या कामाला प्रोत्साहन आणि प्रेरणा देतो असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात विजय वाकेकर यांनी बोलताना स्व.सुवालालजी वाकेकर यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने आदर्श निर्माण केला, ते आम्ही पुढे चालवत आहोत, त्यांचे कार्य आता अधिक गतिमान करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे सांगितले. यावेळी शिक्षिका सौ.रंजना जाधव यांनीही विचार मांडले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने शैक्षणिक, सामाजिक व साहित्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या श्यामसुंदर मुंडे, अनुप कुमार कुसुमकर, अजय जोशी, मोहन कांदे, मुरलीधर कराड, प्रमोद गादेकर, दिगंबर परसेवाड, रूपाली ढाळे, रंजना जाधव,मंजुषा शिंदे, सुषमा साळेगावकर या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन तसेच परळीचे सेवानिवृत्त नायब तहसीलदार बाबुराव रुपनर, रत्नेश्वर विद्यालयाचे प्राचार्य प्रदीप तुळशीराम मुंडे, साहित्यिक अमर हबीब यांना स्व.सुवालालजी वाकेकर स्मृतीपुरस्कार देवून किरणकुमार गित्ते व इतर मान्यवरांच्या हस्ते यावेळी गौरविण्यात आले. या कार्यक्रमात मुंबई येथील मंत्रालयातील कक्ष अधिकारी विशाल राठोड, पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव दिपक तांदळे, ज्ञानबोधिनी विद्यालयाचे मुख्याध्यापक लक्ष्मण मुंडे, केदारी महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक चेतन सौंदळे तसेच सिद्धेश्वर इंगोले आदी मान्यवरांचा गौरव कार्यक्रमात करण्यात आला.

सुत्रसंचालन कवी अनंत मुंडे व बालाजी कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.अरूण पवार यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निवड समिती प्रमुख बंडू आघाव, प्रा.संजय आघाव, सिद्धेश्वर इंगोले, दिवाकर जोशी, प्रा.अर्चना चव्हाण, दीपक वाकेकर, श्री गणगोपलवाड, चंद्रशेखर फुटके, अशोक पिंगळे आदींसह महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. ***

नोंदणी क्र.बीएचआर/एजेआय/आरएसआर/५८८/२००४

# श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या.

परळी वैजनाथ ४३१५१५ जि.बीड

## २१वी वार्षिक सर्वसाधारण सभा

(फक्त सभासदांसाठी)

श्री स्वामी समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित परळी वैजनाथ च्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची **२१**वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दिनांक २८.०९.२०२५ रोजी सकाळी ठिक ११-०० वाजता** पतसंस्थेच्या कार्यालयात संस्थेचे अध्यक्ष **मा.लक्ष्मण इश्वर वाकडे** यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात येणार आहे. तसेच खालील विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात येतील.

सदरील सभेत खालील विषयावरचर्चा होऊन निर्णय घेण्यात येणार आहेत.

**सभेपुढील विषय**

(१) मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

(२) दि.०१.०४.२०२४ ते दि.३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या आर्थीक वर्षाचा ताळेबंद, नफा तोटा पत्रक व तेरीजपत्रकाचे वाचन करून झालेल्या जमा खर्चास मान्यता देणे.

(३) सन २०२४-२५ चा लेखा परिक्षण अहवाल वाचून ऑडीट दोष दुरूस्तीस मान्यता देणे.

(४) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.

(५) सन २०२५-२०२६ या अगामी वर्षाच्या जमा खर्चाच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

(६) मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र दि.२९ जुलै २०२५ अन्वये सुधारित आदर्श उपविधी स्विकारणे बाबत.

(७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

स्थळ : **परळी वैजनाथ**
दिनांक : **१२.०९.२०२५**

सचिव
**मुंदडा सचिन ब्रीजलाल**
श्री स्वामी समर्थ नागरी सह.पतसंस्था म.
परळी वैजनाथ जि.बीड

**विशेष सुचना** :-

१) संस्थेच्या सभासदास सरलेल्या आर्थीक वर्षाची माहिती हवी असल्यास दि.२२.०९.२०२५ पर्यंत लेखी स्वरूपात विचारणा संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत करावी.

२) महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार आवश्यकता असलेली गणसंख्या सभेच्या प्रारंभी नसेल तर सभा अर्धातास तहकुब करून कामकाज सुरू केले जाईल. यास गणपुर्तीची गरज असणार नाही.

**स्थळ :- पतसंस्थेचे कार्यालय, मुंदडा निवास, घरनीकर गल्ली, परळी वै.जि.बीड**
**वेळ :- रविवार २८.०९.२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता**

# तुळजापूर ते सोनपेठ अखंड ज्योतीचे वैद्यनाथ मंदिरात भव्य स्वागत



परळी वैजनाथ, (बातमीदार):- तुळजापूर-शिरसी बुद्रुक-शिरोरी-लोही ग्राम या तीन गावांच्या वतीने निघालेली अखंड ज्योत काल परळी नगरीत दाखल झाली. वैद्यनाथ प्रभूच्या पायऱ्यांवर ज्योत पोहोचताच अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले.

यावेळी ज्योतीचे पूजन उपजिल्हा रुग्णालयाचे प्रमुख डॉ. अरुण गुट्टे व त्यांच्या सौभाग्यवती यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला अ. भा. वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष रामेश्वर महाराज कोकाटे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, पाटलोबा मुंडे, दहिवाळ, जीवण अण्णा शिंदे, प्रल्हाद शेळके, हभप मंगेश महाराज मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ज्योत घेऊन आलेल्या १५१ भाविकांचे फेटे बांधून, पुष्पगुच्छ देऊन व चहापाणी करून सत्कार करण्यात आला. तसेच या ज्योतीचे प्रमुख मार्गदर्शक व अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे सोनपेठ तालुका अध्यक्ष शिवाजीराव फले पाटील यांचाही सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी डॉ. अरुण गुट्टे, वैजनाथराव सोळंके, फले पाटील, पाटलोबा मुंडे व रामेश्वर महाराज कोकाटे यांनी उपस्थित भाविकांचे कौतुक करत सर्वांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.

## दरवळणारा सुगंध...



**विहीर जेव्हां तुडूंब भरते त्याला मुख्य कारण आतील झरे.**

**हे झरेच जर आटले तर काय राहील मग... असेच हे झरे....प्रेमाचे, मायेचे, स्नेहाचे प्रत्येक नात्यात स्त्रवत राहीले तर कोणतंच नातं कधीच आटणार नाही... चांगल्या ह्दयाने खुप नाती बनतात. आणि चांगल्या स्वभावाने ही नाती जन्मभर टिकून राहतात.**